आपल्या परिसरातील ताज्या घडामोडींसाठी
Deshdoot Media Group
आजच डाऊनलोड करा, देशदूतचे मोबाईल अ‍ॅप!
अ‍ॅप डाऊनलोड करण्यासाठी
क्यूआर कोड स्कॅन करा!

शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

पान २
पडसाद : या पोस्टरबॉईजला आवरा
पान ३
नाशिक-दिल्ली विमानसेवा आता टर्मिनल एकवरून
फक्त मनपा शिक्षणाधिकाऱ्यांवरच कारवाई का?
शेवटचे पान
गुजरातमध्ये १,८०० कोटींचे ड्रग्ज जप्त
खैरे-दानवे यांच्यात जुंपली

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५६ । अंक २१८ । मंगळवार, दि. १५ एप्रिल २०२५ । पाने १२ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर


## संपादकीय

### सर्वेक्षण जलस्त्रोतांचे..

जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याच्या सार्वजनिक स्रोतांचे सर्वेक्षण करण्याचा निर्णय नाशिक जिल्हा परिषदेने घेतला आहे. नागरिकांना पिण्याचे स्वच्छ आणि शुद्ध पाणी उपलब्ध व्हावे आणि पावसाळ्यातील संभाव्य साथीच्या आजारांना प्रतिबंध व्हावा, असा या सर्वेक्षणामागचा उद्देश आहे. आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर हे सर्वेक्षण महत्वाचे आहे. कारण दूषित पाणीपुरवठा अनेक आजारांचे कारण आहे. कॉलरा, डायरिया, उलट्या, ताप किंवा पोटाचे विकार होऊ शकतात. ज्यांना जलजन्य आजार मानले जाते. पावसाळ्यात दूषित पाणीपुरवठा होण्याचे प्रमाण वाढण्याचा धोका असतो. सर्वेक्षणाअंती त्याला आळा घातला जाऊ शकेल. अशा सर्वेक्षणाचे अनेक फायदे सांगितले जाऊ शकतील. यानिमित्ताने जिल्ह्यातील सार्वजनिक जलस्रोतांचे दस्तऐवजीकरण (डॉक्यूमेंटेशन) होऊ शकेल. जिल्ह्यातील गावागावात असे स्रोत आढळतात. त्या सर्वांची शासनदरबारी नोंद असेलच असे नाही. ती उणीव यातून दूर केली जाऊ शकेल. अनेक गावे-वाडे आणि पाड्यांवर हंगामी पावसाच्या काळात धो धो पाऊस आणि डिसेंबर महिन्यातच पाणीटंचाईची चाहूल अशी स्थिती वर्षानुवर्षे आढळते. स्रोत ज्ञात असले तर किती जलस्रोतांचे पुनर्भरण करणे शक्य आहे याचा अंदाज प्रशासन घेऊ शकेल. त्याचा आराखडा बनवला जाऊ शकेल. यानिमित्ताने सार्वजनिक जलस्रोतांना धरून जनतेच्या समस्या समजावून घेतल्या जाऊ शकतील. 'देशदूत' वार्ताहरांचा चमू वेळोवेळी ग्रामीण भागात फिरून 'ग्राऊंड रिपोर्ट' तयार करत असतो. त्या त्यावेळी अशा समस्या लक्षात येतात. उदाहरणार्थ, गावच्या विहिरीवरून नळपाणी पुरवठा योजना घेतलेली असते पण कुठे विजेची मोटर नसते तर कुठे नळांना तोट्या नसतात. परिणामी विहिरीवरच्या चकरा सुरूच आढळतात. अशा समस्या प्रशासनाच्या लक्षात येऊ शकतील. पाऊस अत्यंत लहरी होत चालला आहे. कमी दिवसात जास्त पाऊस पडून जाण्याचा नवाच पायंडा पडत आहे. यंदा 'ला निनो' चा प्रवाह समाप्त झाल्याची घोषणा अमेरिकेच्या संस्थांनी माध्यमांमध्ये नुकतीच केली. भारतीय हंगामी पावसासाठी आशादायक ही स्थिती ठरू शकेल असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जातो. तथापि 'निनो' कोणताही असो पावसाच्या प्रमाणाविषयी लोक साशंकच असतात. पूर किंवा दुष्काळ पडू शकतो अशी भीती आढळते. दुष्काळी परिस्थितीत जलस्रोतांचे सर्वेक्षण सरकारी उपाययोजनांना साहाय्यभूत ठरू शकेल. तीव्र दुष्काळाच्या काळात असे नैसर्गिक जलस्रोत ताब्यात घेण्याचा विचार सरकार करू शकते. जेणेकरून सर्वांना पाणीपुरवठा वेळेत आणि सारखा व्हावा. सर्वेक्षणामुळे जलस्रोतांचा नेमका आकडा, त्यांचे ठिकाण आणि स्थिती सरकारकडे तयार असेल. हे साठे नियमित स्वच्छ ठेवण्याचा आराखडा आखण्याचा विचार प्रशासनाला करता येऊ शकेल. पण त्यासाठी सर्वेक्षण अत्यंत प्रामाणिकपणे आणि परिश्रमपूर्वक पार पाडले जाणे अपेक्षित आहे.

## उद्धरली कोटी कुळे, भीमा तुझ्या जन्मामुळे...





◉ भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नाशिक शहरातून काढण्यात आलेली मिरवणूक. मिरवणुकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित तयार करण्यात आलेले चित्ररथ सहभागी झाले होते.

(संबंधित बातम्या आतील पानांवर)

## काँग्रेस संविधानाची भक्षक

### पंतप्रधान मोदींचा हल्लाबोल

**हिसार । वृत्तसंस्था**



काँग्रेस बाबासाहेबांसोबत कशी वागली, हे आपण विसरायला नको. बाबासाहेब जोपर्यंत जिवंत होते, काँग्रेसने त्यांचा अपमान केला. त्यांना दोन वेळा निवडणुकीत पराभूत केले. काँग्रेसने त्यांच्या स्मृती पुसून टाकण्याचाही प्रयत्न केला. काँग्रेसने बाबासाहेबांचे विचार नष्ट करण्याचाही प्रयत्न केला. डॉ बाबासाहेब आंबेडकर हे संविधानाचे रक्षक हो-ते. मात्र, काँग्रेस संविधानाची भक्षक बनली आहे, अशा शब्दात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसवर तोफ डागली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल, सोमवारी हिसार ते अयोध्येसाठी व्यावसायिक विमानसेवेला हिरवा झेंडा दाखवला आणि हिसारमधील महाराजा अग्रसेन विमानतळाच्या नव्या टर्मिनल इमारतीची पायाभरणी पान १० वर

### काँग्रेसने मुस्लिमाला अध्यक्ष बनवावे

पंतप्रधान मोदी यांनी वक्फ कायद्यावरून काँग्रेसवर थेट निशाणा साधला. ते म्हणाले, काँग्रेसने केवळ काही कट्टरपंथीयांनाच खूश केले. उर्वरित समाज दयनीय, अशिक्षित आणि गरीब राहिला. काँग्रेसच्या या वाईट धोरणाचा सर्वात मोठा पुरावा म्हणजे वक्फ कायदा. एवढेच नाही तर, काँग्रेस एखाद्या मुस्लीम नेत्याला अध्यक्ष का बनवत नाही? असा सवालही पंतप्रधान मोदींनी केला.

# पुन्हा नाराजीचे सूर!

## चैत्यभूमीवरील कार्यक्रमात शिंदे, पवारांच्या भाषणाला फाटा

**मुंबई । वृत्तसंस्था**

महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा नाराजी नाट्याच्या चर्चांना उधाण आले आहे. महायुतीचे विधानसभा निवडणुकीत सर्वाधिक आमदार निवडून आल्याने हे सरकार भक्कम असल्याचे मानले जात आहे. असे असले तरी या सरकारमध्ये सातत्याने नाराजीचे सूर ऐकायला मिळतात. पालकमंत्र्याची असो की अन्य वरिष्ठ अधिकाऱ्याची नियुक्ती असो महायुतीत सातत्याने विविध मुद्यांवर मतभेद असल्याचे बघायला मिळते. नुकत्याच केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यादरम्यानही घडलेली नाराजी नाट्याची घटना ताजी असतानाच काल आणखी एक घटना अनुभवास मिळाली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त काल मुंबईत चैत्यभूमीवर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह महायुती सरकारमधील विविध मंत्री पान १० वर

### शिंदे म्हणाले...

एकनाथ शिंदे यांना पत्रकार परिषदेत पत्रकारांनी तुमची नाराजी आहे का? असा प्रश्न विचारला. त्यावर शिंदे म्हणाले, अरे बाबा, चैत्यभूमीला जाणे, बाबासाहेबांचे दर्शन घेणे, बाबासाहेबांना विनम्र अभिवादन करणे यापेक्षा दुसरे काय मोठे असू शकते? त्यामुळे आज बाबासाहेबांची जयंती चैत्यभूमीला साजरी झाली. आम्ही सगळे गेलो. इथे साजरी झाली. वेगवेगळ्या ठिकाणी साजरी होत आहे. हजारो-लाखो ठिकाणी बाबासाहेबांची जयंती साजरी होते. याचा आनंद प्रत्येकाला आहे. तसा मलाही आहे.

# एससी आरक्षणाचे तीन गटांत विभाजन

## तेलंगणा सरकारची अंमलबजावणी

**हैदराबाद । वृत्तसंस्था**

तेलंगणा सरकारने डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या दिवशी अनुसूचित जाती (एससी) वर्गीकरणाच्या अंमलबजावणीबाबत आदेश जारी केला. अनुसूचित जाती समुदायाचे तीन भाग करण्यात आले आहेत. या वर्गीकरणामुळे अनुसूचित जाती आरक्षणात बदल झाला आहे. याबाबत पाटबंधारेमंत्री एन. उत्तम कुमार रेड्डी यांनी ही माहिती दिली. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर अनुसूचित जाती वर्गीकरण लागू करणारे तेलंगणा हे पहिले राज्य ठरले आहे.

तेलंगणा सरकारने उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश शमीम अख्तर यांच्या अध्यक्षतेखाली अनुसूचित जाती वर्गीकरण करण्याबाबत आयोगाची नियुक्ती केली होती. आयोगाच्या शिफारसीनुसार सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणात एकूण १ टक्के आरक्षणासाठी ५९ अनुसूचित जाती समुदायांना तीन गटामध्ये विभागण्यात येणार आहे. तेलंगणा विधिमंडळाच्या अनुसूचित जाती वर्गीकरण कायद्याला ८ एप्रिल २०२५ रोजी तेलंगणाच्या राज्यपालांची मान्यता मिळाली होती. यानंतर १४ एप्रिल २०२५ रोजी तेलंगणा राजपत्रात आदेश जारी करण्यात आले आहेत.

पत्रकार परिषदेत बोलताना अनुसूचित जाती वर्गीकरण उपसमितीचे अध्यक्ष आणि मंत्री उत्तम कुमार रेड्डी म्हणाले, सरकारी आदेशाची पहिली प्रत आज सकाळी मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांना देण्यात आली. राज्यात अनुसूचित जाती वर्गीकरण लागू करण्यात येणार आहे. तेलंगणातील मागील सरकारने वर्गीकरणासाठी ठराव मंजूर करण्यापुरते मर्यादित ठेवले होते. त्याच्यापुढे कधीही ते पुढे नेले नाहीत. आता राज्य सरकारमधील सर्व रिक्त पदे अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणानुसार भरली जाणार आहेत.

### ५९ अनुसूचित जातींना असे असेल आरक्षण

५९ अनुसूचित जातींचे तीन गटांमध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे. गट-१ मध्ये सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिकदृष्ट्या वंचित असलेल्या १५ अनुसूचित जाती समुदायांचा समावेश आहे. त्यांना एक टक्का आरक्षण देण्यात आले आहे. गट-२ मध्ये १८ अनुसूचित जाती समुदाय आहेत. त्यांना ९ टक्के आरक्षण देण्यात आले आहे. तर गट-३ मध्ये अनुसूचित जातीमध्ये २६ जाती समुदाय आहेत. त्यांना पाच टक्के आरक्षण देण्यात आले आहे.

### क्रिमीलेयरला सूट नाही

२०२६ च्या जनगणनेत अनुसूचित जातींची लोकसंख्या वाढली तर त्यांच्यासाठी आरक्षणदेखील त्यानुसार वाढणार आहे. तेलंगणा विधिमंडळाने फेब्रुवारीमध्ये अनुसूचित जाती वर्गीकरणाबाबत न्यायमूर्ती अख्तर यांच्या शिफारशी स्वीकारल्या आहेत. क्रिमीलेयरला आरक्षणातून सूट द्यावी. ही आयोगाची शिफारस तेलंगणा सरकारने नाकारली आहे. तेलंगणा विधिमंडळाने मागासवर्गीय आरक्षणाशी संबंधित दोन विधेयकांना मंजुरी दिली होती.

## प्रसाद हिरे यांचा गीतांजलीसह आज भाजपत प्रवेश

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी संचालक व मालेगाव बाजार समितीचे माजी सभापती प्रसाद हिरे व पत्नी गीतांजली हिरे यांच्यासह समर्थक आज, मंगळवारी भारतीय जनता पक्षात प्रवेश करणार आहेत. मुंबईतील भाजपच्या नरीमन पॉइंट येथील कार्यालयात महसूलमंत्री





चंद्रशेखर बावनकुळे आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत दुपारी २ वाजता हा सोहळा होणार आहे. या सोहळ्यासाठी मालेगावातून ३०० पेक्षा अधिक वाहनांनी कार्यकर्ते सकाळी मुंबईला रवाना होणार आहेत. हिरे दाम्पत्याच्या भाजप प्रवेशामुळे राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या बालेकिल्ल्यात भाजपचे वर्चस्व स्थापन होण्यास बळ मिळणार आहे.

प्रसाद हिरे हे कै. भाऊसाहेब हिरे स्मरणिका समिती ट्रस्ट या अग्रगण्य शिक्षण संस्थेचे पान १० वर

# मंत्रालयावर जाणारा हंडा मोर्चा रोखला

## इगतपुरीतील पाणीप्रश्नी आज बैठक

**इगतपुरी । प्रतिनिधी**

जलजीवन योजना असूनही नसल्यासारख्या आहेत. या योजनांच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे. याकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी हंडे घेऊन निघालेल्या महिला मोर्चेकऱ्यांना अधिकाऱ्यांनी इगतपुरी स्थानकावर रोखून जिल्हाधिकाऱ्यांनी लेखी दिलेले पत्र दिले. त्यामुळे मोर्चेकऱ्यांनी मंत्रालयावर मोर्चा नेण्याचे स्थगित केले.



एल्गार कष्टकरी संघटनेच्या नेतृत्वात काल डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून शेकडो महिला आंदोलक रिकामे हंडे घेऊन मंत्रालयावर धडक देण्यासाठी इगतपुरी रेल्वे स्थानकावर पोहोचले. मात्र, पाणीपुरवठा अधिकारी, तहसीलदार, पोलीस अधिकारी हे जिल्हाधिकाऱ्यांचे पत्र घेऊन तेथे मोर्चेकऱ्यांना भेटण्यासाठी आले होते. त्यांनी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भगवान मधे यांची भेट घेत प्रशासनाची भूमिका मांडली. त्याचबरोबर मोर्चेकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेऊन प्रतिनिधींसोबत संवाद साधला. सर्व मागण्यांच्या अनुषंगाने सर्व १४ खात्यांच्या अधिकाऱ्यांची बैठक इगतपुरीचे उपविभागीय अधिकारी यांच्या कार्यालयात आज, मंगळवारी घेण्याचे सर्वानुमते ठरवण्यात आल्याने आंदोलन तूर्त स्थगित करण्यात आले.

ह्या बैठकीत पाणीप्रश्नी तोडगा निघाला नाही तर मंत्रालयावर कोणतीही पूर्वसूचना न देता धडक मारून आंदोलन करू असा इशारा भगवान मधे यांनी यावेळी दिला. या मोर्चासाठी पान १० वर

# सरपंचपद आरक्षण सोडत कार्यक्रम जाहीर

## जिल्ह्यात १,३८७ ग्रामपंचायती; २१, २३,२४ ला सोडत

**नाशिक । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील ८१० आणि अनुसूचित क्षेत्रातील ५७७ अशा एकूण १,३८७ ग्रामपंचायत सरपंचपदाच्या सोडतीचा कार्यक्रम जाहीर झाला असून, त्यातच महिला सरपंचपदाचेही आरक्षण काढले जाणार आहे. प्रथम २१ एप्रिल रोजी एकत्रित आरक्षण काढल्यानंतर २३ आणि २४ ला तालुकानिहाय महिला आरक्षण जाहीर करण्यात येणार आहे.

एकूण २०२ बिगर अनुसुचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीकरीता सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी प्रवर्गनिहाय सरपंचपदाचे आरक्षण निश्चित करण्यात आले आहे. त्यामुळे त्या जागा सोडून जिल्ह्यातील इतर जागांसाठी आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. अशा सुमारे १,३८७ जागा असून त्यांची सोडत २१ एप्रिल रोजी काढण्यात येईल. त्यानंतर महिला आरक्षण सोडत २३ व २४ एप्रिलला काढली जाईल. त्यामध्ये ७०४ जागा महिला सरपंचपदासाठी राखीव आहे.

जिल्हयातील बिगर अनुसूचित क्षेत्रातील ८१० ग्रामपंचायती आहेत. त्यापैकी ४१४ महिलांसाठी राखीव आहेत. अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीची संख्या ५७७ असून त्यापैकी २९० जागा महिलांसाठी राखीव आहेत. सोमवार दि. २१ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता प्रत्येक तालुक्यात आरक्षण सोडत सभा तहसील कार्यालयात होणार आहे. तहसीलदारांच्या उपस्थितीत इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, कळवण, चांदवड, दिंडोरी, नाशिक, निफाड, बागलाण, मालेगाव, येवला या तालुक्यात महिला आरक्षण सोडत २३ एप्रिलला १२ वाजता तर इगतपुरी, त्र्यंबकेश्वर, कळवण, चांदवड, निफाड, येवला येथे दि. २४ रोजी महिला आरक्षण सोडत होणार आहे.

### बिगर अनुसूचित क्षेत्राबाहेरील जागा

| | |
|---|---|
| अनुसूचित जाती | ५४ |
| अनुसूचित जमाती | १०७ |
| नागरिकांचा मागास प्रवर्ग | २१८ |
| सर्वसाधारण प्रवर्ग | ४३१ |
| एकूण जागा | ८१० |
| अनुसूचित जमाती आरक्षण एकूण जागा | ५७७ |
| महिला आरक्षण | २९० |

नाशिक ■ नाशिक ■ जळगाव ■ धुळे ■ नंदुरबार ■ अहमदनगर येथून एकाच वेळी स्वतंत्रपणे प्रकाशित

www.facebook.com/deshdoot